मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २६८ * सातारा * सातारा शनिवार दि. ८ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

फडणवीसांनी सूडाचं, जाती-धर्माचं राजकारण सुरु करुन राज्य रसातळाला नेलं : राऊत

लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित असं यश ना देशात मिळालय ना महाराष्ट्रात. महाराष्ट्रात भाजपला दोन आकडी संख्याही गाठता आलेली नाही. त्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पराभवाची जबाबदारी आपण घेत असून लवकरच उपमुख्यमंत्री आपण सोडणाल असल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे. तशा प्रकारची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, यावर बोलताना राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी फडणवीसांवर जोरदार टीका केली आहे. 'देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातल्या राजकारणातले खलनायक आहेत' अशा शब्दांत राऊतांनी फडणवीसांवर प्रहार केलाय.

मी अत्यंत कटुतेने बोलतो आहे. कारण राजकारणातली पिढी संपवायचं काम फडणवीसांनी केलं. हातातल्या सत्तेचा वापर राजकारणात सूड घेण्यासाठी केला. न्यायालयांवर दबाव आणला, न्यायमूर्तींवर दबाव आणला, धमक्या देण्यात आल्या. पोलिसांचा वापर राजकीय कामांसाठी केला. या सगळ्याचा उद्रेक होतोच. आज लोकांनी त्यांना उत्तर दिलं. जेवढा राग मोदी शाह यांच्यावर नाही तेवढा देवेंद्र फडणवीसांवर आहे. विदर्भात नितीन गडकरींची जागा सोडली तर विदर्भात फडणवीसांची भाजपा रसातळाला गेली. राजीनामा द्यायची गरज काय? लोकांनीच तुम्हाला घरी पाठवलं आहे. सूडाचं, जाती-धर्माचं राजकारण सुरु करुन राज्य रसातळाला नेलं. आधी त्यांनी स्वतःच्या घरात काय झालं आहे ते फडणवीसांनी बघावं असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. तसंच, फडणवीस हे पेशवाईतल्या आनंदीबाईंप्रमाणे वागत आहेत असा घणाघातही त्यांनी केला आहे.

महाराष्ट्रात दळभद्री आणि घाणेरडं राजकारण

नवाब मलिक, अनिल देशमुख यांना जाऊन भेटा, महापालिकेतल्या लोकांवर खोट्या केस करण्यात आल्या. या सगळ्या कारनाम्यांमुळे त्यांच्यावर आज रडण्याची वेळ आली. मी पुन्हा येईन, दोन पक्ष फोडून येईन जे दोन पक्ष त्यांनी फोडले त्याच पक्षांनी त्यांच्यावर अश्रू ढाळण्याची वेळ आणली आहे. अजून तुम्हाला बरंच काय काय बघायचं आहे. जे काही करायचं आहे ते करा पण महाराष्ट्राच्या इतिहासात तुमचं नाव काळ्याकुट्ट अक्षरांत लिहिलं जाईल. तुम्ही महाराष्ट्राची वाट लावली. मराठी माणसाच्या स्वाभिमानाची वाट लावलीत. बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना तुम्ही फोडलीत, याचा सूड महाराष्ट्र तुमच्यावर सातत्याने घेत राहिलं असंही संजय राऊत यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर फडणवीसांनी महाराष्ट्रात दळभद्री आणि घाणेरडं राजकारण केलं, लोकसभा निवडणुकीत त्यांना जागा दाखवली. ज्या गुदगुल्या त्यांना काही काळ झाल्या त्या अस्वलाच्या गुदगुल्या होत्या असाही टोला संजय राऊत यांनी लगावला आहे.

पंतप्रधान पदासाठी दुसरं नाव

माझ्या माहितीप्रमाणे नरेंद्र मोदींचा पंतप्रधानपदाचा मार्ग सरळ नाही. गेल्या दोन निवडणुकांमध्ये त्यांनी ज्या रुबाबात मोदी पुढे जात होते ते चित्र आज दिसत नाही. मोदींची भाषा बदलली आहे. बॉडी लँग्वेज बदलली आहे. संघाचा विरोध आहे, पक्षांतर्गत विरोध आहे.

मोदी एका अर्थाने पराभूत झालेत असा माणूस पंतप्रधान कसा होऊ शकतो? असा प्रश्न संजय राऊत यांनी विचारला आहे. त्याचबरोबर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला मोदी नको आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आता दुसऱ्या नावाचा शोध घेतला जात आहे असं म्हणत राजनाथ सिंह किंवा नितीन गडकरी यांचं पंतप्रधानपदासाठी नावं पुढं येऊ शकतो असा दावाही राऊतांनी केला आहे.

जरांगे पाटलांच्या उपोषणाला परवानगी नाकारली? कारण आलं समोर..

मुंबई : मनोज जरांगे पाटील पुन्हा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी शनिवार पासून उपोषण करणार आहेत. मात्र, पोलिसांनी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला परवानगी नाकारली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील काय भूमीका घेणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

मनोज जरांगे हे शनिवारपासून पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसणार होते. मात्र मराठा आरक्षण आंदोलनाचे केंद्र असलेल्या आंतरवाली सराटीच्या गावकऱ्यांनी आमरण उपोषणाला विरोध केला होता.

आंतरवाली सराटी गावातील उपसरपंचांसह ६०ते ७० ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आंदोलनामुळे गावातील जातीय सलोखा बिघडत असल्याचे म्हटले होते. तसेच प्रशासनने या उपोषणास परवानगी देऊ नये, अशी मागणी ग्रामस्थांनी या निवेदनातून केली होती.

जातीय सलोखा बिघडण्याची शक्यता तसेच ग्रामपंचायतच्या कामांना अडथळा आणि शालेय विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेता पोलिसांकडून जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला परवानगी नाकारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे हिंजवडीतील ३५ ते ४० कंपन्या बाहेर पडण्याच्या मार्गावर : खा. सुप्रिया सुळे

बारामती : राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे हिंजवडीतील सॉफ्टवेअर कंपन्या बाहेर जात आहेत, ही मोठी चिंताजनक बाब आहे, राज्यातील ट्रीपल इंजिन सरकार यासाठी जबाबदार असल्याचा आरोप नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे यांनी बारामती मध्ये पत्रकारांशी बोलताना केला.

यावेळी खा. सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, हिंजवडीतील या कंपन्या इतर राज्यात जात असतील, तर ही गंभीर बाब आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ने याबाबतची माहिती दिली आहे. त्यांनी पवारसाहेब' यांना पुढील आठवड्यात मोठी बैठक घेण्यासाठी वेळ मागितली आहे.यावेळी राज्य आणि विशेषतः पुण्यातील सगळ्या सॉफ्टवेअर कंपन्यांची आणि मराठा चेंबरची बैठक लावण्याची गरज आहे.३५ ते ४० कंपन्या हिंजवडीतून बाहेर चालल्या आहेत.ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राजीव गांधी इन्फोटेक पार्क आणले.त्यामध्ये ६ लाख जणांना नोकऱ्या मिळाल्या.गेली २५ ते ३० वर्ष त्या कंपन्या उत्तम सुरु होत्या.मात्र, दुर्दैवाने त्या कंपन्या महाराष्ट्र बाहेर चालले आहेत .याबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार मराठा चेंबर ऑफ कॉमर्स समवेत संबंधितांची बैठक घेणार आहे.संबंधित कंपन्यान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही खंबीरपणे साथ देऊ .कंपन्यांना गुंतवणुकीसाठी 'कॉन्फीडन्स'देणे आवश्यक असल्याचे सुळे म्हणाल्या.

विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी कामाला लागली आहे.याबाबत पक्षांच्या नेत्यांमध्ये बैठक देखील पार पडली आहे.शेतकर्यांच्या प्रश्नासह विविध विषयांसाठी आम्हाला विधानसभा निवडणुक महत्वाची असल्याचे सुळे यांनी नमुद केले.एक्झीट पोलच्या नावाखाली झालेल्या मार्केट घोटाळ्याची दबक्या अवाजात चर्चा आहे.याची चौकशी करण्याची मागणी होत असल्यास सरकाने ती करावी,असे सुळे म्हणाल्या.अजित पवार गटाचे आमदार शरद पवार गटात प्रवेश करीत असल्याच्या पत्रकारांच्या प्रश्नावर सुळे यांनी माझे पोट खुप मोठे आहे,माझ्या पोटात खुप गोष्टी राहतात,असे सांगत अधिक भाष्य करणे टाळले. शेतकरी हमीभाव मिळवुन देणे माझ्यासाठी सर्वात मोठा विषय आहे.दुष्काळ कमी करण्यासाठी,हवामान बदल आणि प्रदुषणावरील उपाययोजनांबाबत पॉलीसी लेवलला केंद्र पातळीवर पाठपुरावा करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

युगेंद्र पवार यांना कुस्तीगीर संघावरुन का हटविले,हा मोठा प्रश्न आहे.हा विषय नेमका काय आहे ते समजून घेणार आहे.युगेंद्र पवार कुस्ती क्षेत्रात चांगल काम करीत आहेत.त्याची माहिती घ्यावीच लागणार .

आता लक्ष्य विधानसभा: रमेश चेन्नीथला

मुंबई : लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकजूट होऊन काम केले, जिल्हा, ब्लॉक स्तरावर संघटनेला चालना दिली. उमेदवारी देतानाही सर्वांना विचारातून घेऊन निर्णय घेतला आणि सर्वांच्या एकजुटीने काँग्रेस पक्षाने १७ जागा लढवून १४ जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. हे यश कार्यकर्त्यांच्या एकजुटीचे आहे, एकजुटीची ही वज्रमुठ अशीच कायम ठेवणे गरजेचे आहे. लोकसभेची लढाई आपण जिंकली आहे आता विधानसभा हे आपले लक्ष्य असून असाच लढा देऊ व विधानसभेत महाविकास आघाडीचे सरकार आणू, असा विश्वास प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे.

काँग्रेस मुख्यालय, टिळक भवन येथे काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित खासदारांची बैठक पार पडली, यावेळी सर्व नवनिर्वाचीत खासदारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, आघाडीचे राजकारण सोपे नसते पण सर्व घटक पक्षांशी चर्चा करुन महाविकास आघाडी मजबूत केली व निवडणुकीला सामोरे गेलो. भारतीय जनता पक्षाच्या हुकूमशाही सरकारचा पराभव करण्यासाठी विरोधी पक्षांनी ऐक्य केले आणि जनतेनेही काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीवर विश्वास व्यक्त करत कौल दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात १८ जाहीर सभा घेतल्या, मंगळसुत्र, हिंदू-मुस्लीम, पाकिस्तान हे मुद्दे पुढे करत विभाजनकारी राजकारण केले पण जनता यावेळी मोदींच्या अपप्रचाराला बळ पडली नाही.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राहुल गांधी यांनी पदयात्रा काढून देशातील वातावरण बदलून टाकले व जनतेत मोठा आत्मविश्वास निर्माण केला. देशाची लोकशाही व संविधान वाचवण्याच्या लढाईत तानाशाही सरकार विरोधात ते खंबीरपणे लढले व जनताही त्यांच्या पाठीशी उभी राहिली, राहुल गांधी यांच्या गॅरंटीवर जनतेने विश्वास ठेवला. कार्यकर्त्यांची मेहनत व मजबूत संघटन, मल्लिकार्जून खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या मार्गदर्शनामुळे काँग्रेस पक्षाने मोठा विजय संपादीत केला आहे. काँग्रेसच्या या विजयात सर्व जाती धर्मांच्या लोकांचे समर्थन आहे. काँग्रेस पक्षावर जनतेने दाखवलेल्या या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे नाना पटोले म्हणाले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व राज्यसभा खासदार मुकूल वासनिक यावेळी म्हणाले की, काँग्रेस पक्षाची २०१९ च्या निवडणुकीत चांगली कामगिरी झाली नव्हती, २६ जागा लढवून १ जागा जिंकू शकलो पण यावेळी मात्र १७ जागा लढवल्या व १४ जागेवर घवघवीत यश संपादन केले आहे. हे यश पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन व कार्यकर्त्यांची मेहनत यामुळे शक्य झाले आहे. लोकसभेच्या विजयात राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनियाजी गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांचे मार्गदर्शन व योगदान अत्यंत महत्वाचे आहे. असे सांगत मुकूल वासनिक यांनी या वरिष्ठ नेत्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला व टाळ्यांच्या गजरात तो एकमताने संमत करण्यात आला.

या बैठकीला प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकूल वासनिक, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह काँग्रेस नेते पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अजित पवार गटाचे अनेक आमदार आमच्या संपर्कात : रोहित पवार

मुंबई : लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आमदारांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता असून त्यांचे १८ आमदार आमच्या संपर्कात आहेत. त्यांना प्रवेश देण्याबाबत पक्षप्रमुख शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील निर्णय घेतील, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे.

परत येऊ इच्छिणाऱ्यांना पंधरा दिवसांची मुदत

शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. अनेक मंत्र्याच्या मतदारसंघात उमेदवार निश्चित केले आहेत. अजित पवार गटातून परत येऊ इच्छीणाऱ्या आमदारांना पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली आहे. कोणाला पक्षात घ्यायचे आणि कोणाला नही, याबाबत शरद पवार आणि जयंत पाटील योग्य तो निर्णय घेतील, असे रोहित पवार म्हणाले.

अजित पवार गटाच्या आमदारांच्या बैठकीला नरहरी झिरवळ, सुनील टिंगरे, राजेंद्र शिंगणे, अण्णा बनसोडे, धर्मराव अत्राम हे आमदार अनुपस्थित होते. त्याची कारणे देखील या आमदारांनी दिली आहे. मात्र, आमदारांमधील अस्वस्थतेची चर्चा होत असताना या आमदारांच्या अनुपस्थितीचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

आमदार अस्वस्थ असल्याचा तटकरेंकडून इंकार

लोकसभा निवडणुकीनंतर आपल्या पक्षातील आमदार अस्वस्थ असल्याचा अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी इन्कार केला. या निवडणुकीत महायुती अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र, या निवडणुकीत विरोधकांकडून मोठ्या प्रमाणावर अपप्रचार करण्यात आला. कोणी कसे आणि कुठे खोटे व्हिडिओ तयार केले आणि ते व्हायरल केले याची पूर्ण माहिती आमच्याकडे आहे. विधानसभा निवडणुकीत त्याबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल. आपला पक्ष आणि महायुती एकसंधपणे आणि आक्रमकपणे विधानसभा निवडणूक लढवेल, असेही तटकरे यांनी सांगितले.

आम्ही बांगलादेशी परिसरात हरलो; असं ट्वीट करणं सोमय्यांच्या अंगलट येणार? ठाकरे गटाची तक्रार

मुंबई : लोकसभा निवडणुकीत भाजपला मुंबईत दोन जागा गमवाव्या लागल्या आहेत. ईशान्य मुंबई मतदारसंघात उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजय दिना पाटील यांनी भाजपचे मिहीर कोटेचा यांचा पराभव केला आहे. या पराभवानंतर भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी एक वादग्रस्त ट्वीट केले आहे. आमचा उमेदवार बांगलादेशी परिसरात हरला आहे. परंतु हे ट्वीट सोमय्या यांच्या अंगलट येण्याची शक्यता आहे. किरीट सोमय्या यांची तक्रार ठाकरे गटाचे पुणे शहराप्रमुख संजय मोरे व इतरांनी याबाबत पुणे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांच्याकडे तक्रार केली आहे.

तसेच याबाबत भारत निवडणूक आयोग, केंद्रीय गृहमंत्री, राज्याचे गृहमंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे. भाजप मिहीर कोटेचा ईशान्य मुंबई २९,८६१ मताने पराभूत. मानखुर्दमध्ये ८७, ९७१ मतांची तूट. मुलुंड ते घाटकोपर ५८,११० मतांचा लीड. मानखुर्द विधानसभा (बांगलादेश परिसर) उद्धव ठाकरे सेना १,१६,०७२ मते, तर भाजपला २८,१०१ मते. आम्ही बांगलादेशी परिसरात हरलो, पराभूत झालो, असे वादग्रस्त ट्वीट सोमय्या यांनी केले आहे.

या विधानाचा अर्थ असा होत आहे की मुंबई शहरातील हा भाग मुंबईचा नसून बांगलादेशचा आहे. असे त्यांनी त्यांच्या विधानामधे स्पष्ट उल्लेख केला आहे. हे विधान देशाच्या अखंडतेला तडा देणारे आहे. देशाच्या अखंडतेवर बोलणे व त्यावर शंकास्पद विधान करणे हे देशद्रोह करण्यासारखे आहे. भारत देश हा अखंड आहे. मुंबईच काय तर देशातील कोणत्याही राज्याचा भाग हा शेजारील राष्ट्राचा होऊ शकत नाही. असे विधान करणे म्हणजे केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या कार्यपद्धतीवर अविश्वास करण्यासारखे, असे तक्रारीत म्हटले आहे.

एटीएस अथवा एनआयएचा मार्फत चौकशी करा

त्या भागाला जर ते बंगलादेशी परिसर म्हणत असतील तर त्यांच्याकडे असे कोणते पुरावे आहेत. ज्यामुळे ते हे सिद्ध करू शकतात ? याचीही चाचणी -ढड अथवा छख- च्या मार्फत करणे क्रमप्राप्त आहे. कारण सदर व्यक्ती ही देशातील व राज्यातील सत्ताधारी पक्षातील वरिष्ठ नेते आहेत. त्यांच्या विधानाची पडताळणी करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी सदर व्यक्तीस ताब्यात घेऊन त्यांनी केलेल्या विधानाची त्यांच्याकडे चौकशी करण्यात यावी. तसेच मानखुर्द हा भाग महाराष्ट्रातील मुंबई या शहरातील आहे. त्याबद्दल असे विधान करणे हे त्या भागातील दलित व अल्पसंख्याक लोकांचा अपमान करण्यासारखे आहे. त्यामुळे सदरचा गुन्हा हा ट्रॉसिटी अंतर्गत येत असल्यामुळे किरीट सोमय्या यांच्यावर ट्रॉसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून पुढील चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मतदान करणारे लोक हे बांगलादेशी परिसरातील आहे असे मत मांडणे म्हणजे निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण करणारे आहे. यात कोणतीही शंका उपस्थित होत नाही. त्यामुळे सदरची तक्रार आपल्या मार्फत निवडणूक आयोगाला करण्यात यावी, अशी विनंती करीत आहोत.

सोमय्यांचा बंदोबस्त करा

या व्यक्तीने देशांमधील दोन समाजामध्ये जाणीवपूर्वक तेढ निर्माण करण्यासाठी व विशिष्ट जातीच्या लोकांना व धर्माच्या लोकांना कमी लेखण्याच्या हेतूनेच सदरचे विधान केले आहे. किरीट सोमय्या यांना ताब्यात घेऊन पुढील फौजदारी कारवाई करून व देशाच्या संविधानातील अखंडतेचे व समतेचे रक्षण कराल, याची आम्हाला खात्री आहे. अन्यथा शिवसेना पुणे शहराच्या वतीने देशांमध्ये अखंडता व समतेवर घाला घालणाऱ्या नेत्यांचा बंदोबस्त शिवसेना पुणे शहराच्या वतीने

अखेर कोकण पदवीधर मतदारसंघातून मनसेची माघार, भाजपाच्या प्रयत्नांना यश

मुंबई : राज्याच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर आली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढण्याची जोरदार तयारी केल्यानंतर आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अचानक निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. त्यामुळे अभिजीत पानसे आता उमेदवारी अर्ज दाखल करणार नाहीत. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निरंजन डावखरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची (ठ्रक्ष ढहरलज्ञशीरू) भेट घेतली होती. यानंतर मनसेचे नेते नितीन सरदेसाई यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी या निर्णयाची माहिती दिली. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विनंती केली होती. त्या विनंतीला मान देऊन आम्ही माघार घेत आहोत असे सरदेसाई यावेळी म्हणाले.

मनसेने निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर आता भाजपसाठी ही निवडणूक सोपी झाली आहे. या निर्णयाबद्दल अधिक माहिती देताना सरदेसाई म्हणाले, दोन दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीसांनी राज ठाकरेंची भेट घेतली होती. या भेटीत फडणवीसांनी विनंती (ऊर्शीशपवीर ऋवपरींळी) केली. त्यांच्या या विनंतीला मान देऊन कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक मनसे लढणार नसल्याचे निश्चित करण्यात आले. या निर्णयानुसार आता अभिजीत पानसे उमेदवारी अर्ज भरणार नाहीत.

कोकण पदवीधर मतदारसंघात मनसेला मानणारा पदवीधर वर्ग मोठा आहे. जर या मतदारसंघात मनसेने उमेदवार दिला असता तर भाजपाच्या मतांवर त्याचा निश्चित परिणाम झाला असता. त्यामुळे भाजपाने तत्काळ हालचाली सुरू केल्या. देवेंद्र फडणवीसांनी सूत्रे हाती घेतली आणि राज ठाकरेंना विनंती केली. त्यांच्या या विनंतीचा मनसेनेही विचार करत निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली.

दरम्यान एकीकडे राज्यातील राज ठाकरे यांचा पक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीला कोणत्याही अटी शर्थींविना पाठिंबा जाहीर केला होता. मात्र विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये कोकण पदवीधर मतदार संघात उमेदवारही दिला होता.

संपादकीय

पुन्हा किंगमेकर

तब्बल २० वर्षांनंतर पुन्हा देशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी येण्याची किमया तेलुगू देसमचे एन. चंद्राबाबू नायडू यांनी साधली आहे. १९९६ ते २००४ या काळात संयुक्त आघाडी व नंतर भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे समन्वयक म्हणून त्यांनी राष्ट्रीय राजकारणात 'किंगमेकर'ची भूमिका बजाविली होती. २००४ ते २०१४ या दहा वर्षांत लागोपाठ दोन पराभवांमुळे राजकीय विजनवासात गेलेल्या नायडू यांना २०१४ मध्ये आंध्र प्रदेशची सत्ता मिळाल्याने बळ मिळाले. पण २०१९ मधील दारुण पराभव आणि त्यानंतर गैरव्यवहारांच्या आरोपांवरून तुरुंगवारी या साऱ्यांतूनही ते परत बाहेर आले आहेत. विधानसभेच्या १३५ तर लोकसभेच्या १६ जागा जिंकल्याने चंद्राबाबूंचे राजकीय वजन पुन्हा वाढले आहे, याचा प्रत्यय काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकीत नुकताच आला. या बैठकीत नरेंद्र मोदी यांच्या अगदी शेजारी बसण्याची संधी चंद्राबाबूंना मिळाली. केंद्रात बहुमतासाठी थोडे कमी म्हणजे २४० खासदार निवडून आल्याने भाजप स्वबळावर सत्ता स्थापन करू शकत नाही. अशा वेळी भाजपची सारी मदार ही मित्रपक्षांवर असेल. १६ खासदार निवडून आलेत असा तेलुगू देसम हा रालोआतील भाजपनंतरचा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष. साहजिकच चंद्राबाबूंचे महत्त्व वाढले. वाजपेयी सरकारच्या काळात 'रालोआ'च्या समन्वयकपदी असताना चंद्राबाबूंनी त्याची किंमत पुरेपूर वसूल केली होती. केंद्राकडून विविध सवलती त्यांनी तेव्हा मिळविल्या होत्या. आंध्रमध्ये भात हे महत्त्वाचे पीक. तिथे पिकणारा तांदूळ त्यांनी केंद्राच्या अन्न महामंडळाला खरेदी करण्यास भाग पाडला होता. ऊर्जा क्षेत्रात विविध सुधारणा राबविल्या होत्या. हैदराबाद शहर ही माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची राजधानी व्हावी यासाठी प्रयत्न केले होते. या साऱ्या योजना राबविण्याकरिता केंद्राकडून भरीव मदत मिळवली होती. त्यामुळे आता पुन्हा चंद्राबाबूंच्या मागण्या वाढणार हे नक्की. तसे संकेतही त्यांनी दिले आहेत. आता फरक एवढाच की, तेव्हा सर्वांना बरोबर घेऊन जाणारे वाजपेयी पंतप्रधान होते आणि आता मोदी पंतप्रधान आहेत! आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा मिळावा यासाठी रालोआचा घटक पक्ष म्हणून चंद्राबाबू यांनी २०१४ ते १८ या काळात येनकेनप्रकारेण दबावाचे राजकारण करून बघितले. पण मोदी काही बधले नाहीत. शेवटी २०१८ मध्ये चंद्राबाबूंना भाजपची संगत सोडावी लागली. अर्थात तेव्हा भाजपला चंद्राबाबूंची तेवढी गरजही नव्हती. पण आता परिस्थिती बदलली आहे.

दक्षिणेकडील सर्वच प्रादेशिक पक्षांच्या मुख्यमंत्र्यांचे एक वैशिष्ट्य असते. आपल्या राज्याच्या मागण्या मंजूर करून घेण्यासाठी पंतप्रधानांच्या नजरेला नजर भिडविण्याची हिंमत ते दाखवितात. हिंदीच्या अतिक्रमणाच्या विरोधात किंवा अगदी 'दही' शब्दावरूनदेखील तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. स्टॅलिन यांनी अलीकडेच केंद्राशी दोन हात केले. 'अमूल' आणि 'नंदिनी' दुधाच्या वादात कर्नाटकातील सगळे राजकीय नेते केंद्राच्या विरोधात संघटित झाले होते. केंद्राने भात खरेदी करण्यास नकार देताच तेलंगणाचे तत्कालीन मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांनी थेट पंतप्रधान मोदी यांना आव्हान देण्याची हिंमत दाखविली होती. ही सगळी जुनी नाहीत, तर अगदी अलीकडची उदाहरणे आहेत. महाराष्ट्रात मात्र याच्या नेमके उलटे चित्र आहे. फोडाफोडी करून सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'महाशक्ती' आपल्या पाठीशी असल्याची आणि ती आपल्याला काहीही कमी पडू देणार नसल्याची ग्वाही सुरुवातीलाच दिली होती. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच 'वेदांन्त- फॉक्सकॉन' आणि 'टाटा-एअरबस' हे दोन राज्यात गुंतवणूक होऊ घातलेले प्रकल्प गुजरातमध्ये हलविण्यात आले. पण मुख्यमंत्री शिंदे यांनी चकार शब्दाने केंद्राला जाब विचारण्याचे धाडस दाखविले नाही. उलट हे दोन प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याने मोदी यांनी आपल्याला महाराष्ट्रात महाकाय प्रकल्प उभारण्याचे आश्वासन दिल्याचे ते सांगत राहिले. पण त्यालाही आता दोन वर्षे होत आली तरी महाराष्ट्रात कोणताही मोठा प्रकल्प अजून तरी आलेला नाही. मुंबईतील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र गुजरातमध्ये 'गिफ्ट सिटी'त हलविण्यात आले. पण त्यावरही महाराष्ट्रातील राज्यकर्ते मूग गिळून गप्प राहिले. या पार्श्वभूमीवर बंगळूरु, हैदराबाद किंवा चेन्नई या शहरांच्या विकासाबाबत तेथील राज्यकर्ते कमालीचे संवेदनशील असतात आणि प्रसंगी केंद्राबरोबर दोन हात करण्याची त्यांची तयारी असते.

आंध्रात तेलुगू देसम, जनसेना आणि भाजप यांच्या युतीचे सरकार सत्तेत येणार असले तरी १७५

देहू नगरपंचायतचे बांधकाम सभापती योगेश परंडवाल तर बालकल्याण सभापती पुजा काळोखे यांची निवड

पिंपरी चिंचवड : देहू नगरपंचायतीच्या विविध चार समितीच्या सभापती व सदस्यांसाठी निवडणूक प्रक्रिया शुक्रवारी (दि ७) नगरपंचायत सभागृहांमध्ये पार पडली उपजिल्हाधिकारी संजय असवले हे निवडणूक प्रक्रियेचे अधिकारी होते.

निवडणूक प्रक्रियेला सकाळी १० वा.सुरुवात झाली.विषय समित्यांची संख्या निश्चित करणे,विषय समित्यांची सदस्य संख्या ठरविणे तसेच नामनिर्देशन स्वीकारणे,नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे जाहीर करणे,त्यानंतर

छाननी व माघारी त्यानंतर २.३० वाज. सभापती जाहीर करणे असा निवडणूक प्रक्रिया राबताना महिला व बालकल्याण समिती सभापती पदी पूजा काळोखे, बांधकाम सभापती योगेश परंडवाल,स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती सुधीर काळोखे यांची सभापती पदी नियुक्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.उपनगराध्यक्ष हे स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समितीचे पदसिद्ध सभापती असल्याने काळोखे यांनी पाणीपुरवठा व जलनिसा:रण समितीसाठी नामनिर्देशन भरल्याने तो अवैद्य ठरवण्यात आला. त्यामुळे सद्या जलनिसरण सभापती हे पद रिक्त आहे. निवडणूक प्रक्रिया दरम्यान नगराध्यक्ष पूजा दिवटे,मुख्याधिकारी निवेदिता घार्गे,उपनगराध्यक्ष सुधीर काळोखे,गटनेता योगेश परंडवाल,योगेश काळोखे,प्रवीण काळोखे,आदीत्य टिळेकर,मयूर शिवशरण,पूजा काळोखे,रसिका काळोखे,ज्योती टिळेकर आदी वगळता सात नगरसेविका अनुपस्थित होत्या.

बी-बियाणे, खते वेळेत उपलब्ध करण्याचेकृषीमंत्र्यांचे निर्देश

मुंबई : यावर्षी खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरने वाढ झाली असून बियाण्यांच्या व खतांच्या पुरवठ्याबाबत सूक्ष्म नियोजन केले जात आहे. सध्याची एकूण बियाणे मागणी ही १८ लाख क्विंटल इतकी असून वाढलेल्या क्षेत्राचा विचार करून राज्य शासनाने २४ लाख क्विंटल बियाणे मंजूर केले आहे. त्यापैकी १३ लाख क्विंटल वितरीत केले असून आणखी ६ लाख क्विंटल वितरणाच्या स्थितीत आहे. तर उर्वरित बियाणे देखील वेळेत वितरीत केले जाईल, असे नियोजन केले जात असल्याची माहिती, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

खरीप हंगाम पूर्व तयारीच्या अनुषंगाने खते, बियाणे उपलब्धतेबाबत मंत्रालयात आढावा बैठक आयोजित केली होती. त्यावेळी मंत्री मुंडे बोलत होते. यावेळी कृषी विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कृषी आयुक्त रावसाहेब भागडे, गुण नियंत्रण विभागाचे संचालक विकास पाटील, बी-बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक गोंदवले, महाबीजचे कलंत्री, कृषी विद्यापीठांचे बियाणे विभाग प्रमुख, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे पदाधिकारी प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी मुंडे म्हणाले की, सध्या राज्यशासनाने खते व कृषी निविष्ठा यांचे गैरव्यवहार रोखून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कृषी कायदे प्रस्तावित केले आहे. हे कायदे विधिमंडळाच्या विचारार्थ प्रलंबित आहेत. सर्व प्रकारचे बियाणे शेतकऱ्यांना योग्य भावात मिळावेत तसेच खतांचा मुबलक साठा व त्याचे योग्य वितरण व्हावे, यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्याचे निर्देशही मंत्री. मुंडे यांनी दिले.

बी बियाण्यांची चढ्या भावाने विक्री, कृत्रिम टंचाई इत्यादी बाबत शेतकऱ्यांना थेट तक्रार करता यावी व विभागाला व्यक्तिशः ती तक्रार सोडवता यावी, यासाठी शासनाचा व्हाट्सप क्रमांक २४ तासात सक्रीय करून शेतकऱ्यांना कळविण्याचे निर्देश मुंडे यांनी दिले .

दरम्यान राज्यात विशिष्ट कंपन्यांच्या बियाण्यांची मागणी केली जाणे, साठेबाजी याबाबतच्या उपाययोजना देखील सुचवल्या आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कापूस-सोयाबीन योजना व अन्य योजनांच्या तसेच महाबीजच्या माध्यमातून खरीप हंगामासाठी आवश्यक बी-बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध करण्यात आले असून, कुठेही त्याची टंचाई भासणार नाही, असे नियोजन करण्यात येत आहे.

कृषी निविष्ठा दुकानांमधून चढ्या भावाने केली जाणारी विक्री, कृत्रिम टंचाई, बोगस बियाणे विक्री याबाबत विभागाने धडक कारवाया कराव्यात. शेतकऱ्यांनी तक्रारी करूनही एखाद्या ठिकाणी विभागाने कारवाई न केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई केली जाईल, असेही मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी कृषी विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन यांनी खरीप हंगाम पूर्व तयारीच्या अनुषंगाने खते, बियाणे उपलब्धतेबाबतची माहिती आढावा सादर केली.

नैराश्यावर मात करण्यासाठी आरोग्य विभागाची टेलिमानस सेवा

सेवेचा लाभ घेण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

मुंबई : सध्या इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षांचे निकाल लागले आहेत. या परीक्षांमध्ये कमी गुण मिळालेले अथवा अपयश आलेल्या विद्यार्थ्यांकडून टोकाचे पाऊल उचलले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नैराश्य आलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन करून त्यामधून बाहेर काढणे गरजेचे आहे. त्यासाठी आरोग्य विभागाची टेलिमानस - 'मनोविकारावरील दूरध्वनीद्वारे सल्ला' ही सेवा उपलब्ध आहे. टेलिमानस या सेवेकरिता टोल फ्री क्रमांक १४४१६ (भ्रमणध्वनीसाठी) आणि १८००८९१४४१६ (लँडलाईनसाठी) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तरी या सेवेचा गरजू विद्यार्थी, नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

या टोल फ्री क्रमांकाच्या माध्यमातून क्लिनिकल सायकॉलॉजीस्ट, सायक्याट्रिक नर्स आणि सायक्याट्रिक सोशल वर्कर समुपदेशनाचे कार्य करीत असून या सेवेसाठी मनोविकृतीतज्ज्ञदेखील नियुक्त आहेत. राज्यात आजपर्यंत ७० हजार व्यक्तींनी समुपदेशनाचा लाभ घेतला आहे. यामध्ये नैराश्य, ताणतणाव, निद्रानाश, दु:खी मन:स्थिती, पौगंडावस्थेतील मानसिक स्थित्यंतरे आदी समस्यांचे निराकारण केले जाते. राज्याच्या टेलिमानस कार्यक्रमाच्या उपयोगीतेमध्ये देशात दुसरा क्रमांक आहे. मोठ्या प्रमाणात गरजू नागरिक या सेवेचा लाभ घेत आहेत, असे आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिकेस १४ जून पर्यंत मुदतवाढ

मुंबई : ५८ , ५९ आणि ६० व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता १४ जून २०२४ पर्यंत प्रवेशिका सादर करता येणार आहेत. त्यामुळे निर्मात्यांनी अनुक्रमे सन २०२०, २०२१ आणि २०२२ या कॅलेंडर वर्षात सेन्सॉर प्राप्त झालेल्या मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका दिलेल्या विहित मुदतीत सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी केले आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत राज्य मराठी चित्रपट पुरस्कार हा मानाचा पुरस्कार आहे. राज्य शासनाच्या वतीने या पुरस्कारासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५ येथील जनसंपर्क विभागात कार्यालयीन वेळेत प्रवेशिका उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ु. षळश्रालळीूीलरळ.ीस या संकेतस्थळावर देखील सविस्तर माहिती उपलब्ध आहे. निर्मात्यांनी परिपूर्ण अर्ज भरून महामंडळाकडे विहित मुदतीत प्रवेशिका सादर करायच्या आहेत.

५८ आणि ५९ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारासाठी ज्या निर्मात्यांनी यापूर्वी सांस्कृतिक कार्य संचालनालय येथे प्रवेशिका सादर केल्या आहेत त्यांनी पुन्हा प्रवेशिका सादर करण्याची आवश्यकता नाही. ज्या निर्मात्यांना अद्याप प्रवेशिका सादर करता आलेल्या नाहीत त्यांनी दिलेल्या मुदतीत प्रवेशिका सादर करायच्या आहेत.

राहुल गांधींची पदयात्रा व न्यायपत्राचा काँग्रेसच्या विजयात मोठा वाटा: नाना पटोले

लोकसभेतील विजयानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची टिळक भवन येथे लाडूतुला

मुंबई : खासदार राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर व मणिपूर ते मुंबई अशी १० हजार किलोमीटरची पदयात्रा काढून देशभरातील वातावरण बदलले. या पदयात्रेत जनतेने ज्या समस्या राहुल गांधी यांच्याकडे मांडल्या त्याच्याच आधारावर काँग्रेसचा जाहीरनामा न्यायपत्र बनवले होते. जनतेने पदयात्रा व काँग्रेसच्या न्यायपत्रावर मोठा विश्वास दाखवत काँग्रेस उमेदवारांना विजयी केले, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

काँग्रेस पक्षाने राज्यात लोकसभेच्या १७ जागा लढवून १३ जागांवर दैदिप्यमान यश मिळवले आहे. काँग्रेसच्या या यशानंतर काँग्रेस मुख्यालय, टिळक भवन येथे नाना पटोले यांची कार्यकर्त्यांनी लाडूतुला केली. यानंतर पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाच्या तानाशाही सरकारला जनता कंटाळली होती.

लोकशाही व संविधानाला पायदळी तुडवत १० वर्ष अत्याचारी सरकार चालवले याचा जनतेत मोठा राग होता म्हणूनच जनतेने काँग्रेस इंडिया आघाडीला मोठा जनाधार दिला आहे. महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष २०१९ च्या निवडणुकीत १ जागेवर विजयी झाला होता यावेळी २०२४ च्या निवडणुकीत १३ जागी विजय मिळवला आहे. या विजयात काँग्रेस व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची मेहनत व परिश्रम यांचेही मोठे योगदान आहे. विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडी लोकसभेपेक्षा चांगली कामगिरी करून भाजपाप्रणित महायुती सरकारचा पराभव करेल, असा विश्वासही नाना पटोले यांनी व्यक्त केला.

श्रीक्षेत्र देहू येथे जगातील सर्वात मोठ्या पाऱ्यांच्या विहिरीचा भूमिपूजन सोहळा संपन्न

पिंपरी चिंचवड : श्रीक्षेत्र देहू मधे दि ६ रोजी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जगातील सर्वात मोठ्या पायऱ्यांच्या विहिरीची पायाभरणी आज संपन्न झाली.

भारतातील पहिल्या शाश्वत टाऊनशिप मध्ये बांधण्यात येणारी ही स्टेपवेल गेल्या ५०० वर्षातील अशा प्रकारचा पहिला जलसंधारण प्रयत्न असेल. इव्हो ग्रीन सिटी, ऑरेंज काउंटी द्वारे विकसित इव्हो ग्रीन सिटी देहू येथे जगातील सर्वात मोठ्या पायऱ्यांच्या विहिरीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज झाले.

प्राचीन जलसंधारण तंत्र व स्थापत्य सौंदर्याचा अनुभव घेण्यासाठी गुजरात आणि राजस्थान मधील पायऱ्यांच्या विहिरीला भेट देत असताना. आता पुण्यात देहू येथे लवकर जगातील सर्वात मोठी स्वतःची पायऱ्यांची विहीर असेल. पर्यावरण पूरक प्रकल्पासाठी ओळखले जाणारे प्रख्यात बांधकाम व्यवसायिक

संदीप सोनिग्रा हे इव्हो ग्रीन सिटी मध्ये जगातील सर्वात मोठी स्टेपवेल बांधणार आहे.

इव्हो ग्रीन सिटी ही देशातील पहिली शाश्वत टाऊनशिप असेल आणि या प्रकल्पाला लागुन एक किलोमीटर इंद्रायणी नदी वाहते. दोन जर्मन विद्यापीठांनी राबवलेल्या ऊर्जा आणि साठवलेल्या पाण्यावर ही संपूर्ण टाऊनशिप अवलंबून असेल.

साधारणतः ९० हजार क्युबिक मीटरच्या व्हॉल्युम सह ही विहीर बांधण्यात येईल. पावसाच्या पाण्याचे जतन करून टाऊनशिप मधील पंधरा हजार रहिवाशांची पाण्याची गरज भागवली जाईल. याशिवाय भूजल पातळी वाढुन संपूर्ण देहू गावाला त्याचा फायदा होईल.

स्टेपवेलच्या पहिल्या टप्प्याच्या कामाची पायाभरणी आज झाली. संपूर्णपणे दगडाने बनवलेली ही पायऱ्यांची विहीर पहिल्या टप्प्यात दहा मीटर खोल असेल आणि पुढील वर्षी जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी तिचे उद्घाटन होईल. दुसऱ्या टप्प्यात स्टेप वेल वीस मीटर खोल जाईल. ते काम पूर्ण होण्यासाठी आणखी तीन वर्षे लागतील.

इव्हो ग्रीन टाऊनशिप मध्ये बांधकामासाठी पर्यावरण पूरक साहित्य वापरण्या व्यतिरिक्त बांधकामनानंतरच्या बाबींमध्ये नवीकरणीय ऊर्जा आणि पायऱ्यांच्या विहिरीतील पाण्याचा संपूर्ण वापर समाविष्ट असेल.

अशा ह्या जगातील सर्वात मोठ्या पायऱ्यांच्या विहिरीच्या भूमिपूजन समारंभा निमित्त उपस्थितांमध्ये जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज देवस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी श्री क्षेत्र देहू नगरपंचायत च्या नगराध्यक्ष पूजाताई दिवटे श्रीक्षेत्र देहू नगर पंचायत च्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे श्रीक्षेत्र देहू नगर पंचायत चे नगरसेवक योगेश काळोखे, प्रवीण काळोखे, योगेश परंडवाल, मयूर शिवशरण, तसेच प्राध्यापक संदीप भोसले देहू राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विवेक काळोखे तसेच इव्हो ग्रीन सिटी चे संदीप सोनिग्रा, आनंद छाजेड, सचिन कांकरिया, नितीन धोका, आदेश धोका, सागर शेठ भसे शेखर शेलार तसेच सर्व संचालक, कर्मचारी वर्ग, विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

उद्धव ठाकरेंचे दोन खासदार मोदींना पाठिंबा देणार

शिवसेना खासदाराचा दावा, ठाकरे गटात भूकंप?

मुंबई : लोकसभा निवडणुकीचे निकाल नुकतेच लागले आहेत. या निवडणुकीत महायुतीला फक्त १७ जागांवर यश मिळालं आहे. अशात ठाकरे गटात पुन्हा एकदा भूकंप होणार का? या चर्चा सुरु झाल्या आहेत. फोडाफोडी होऊनही ठाकरेंच्या शिवसेनेने ९ खासदार निवडून आणले. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे सात खासदार निवडून आले आहेत. अशात एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात ठाकरे गटाच्या दोन खासदारांनी काम करण्याची तयारी दर्शवली असल्याची माहिती समोर आली आहे.

खासदार नरेश म्हस्केंचा दावा काय?

खासदार नरेश म्हस्केंनी हा दावा केला आहे की उद्धव ठाकरेंच्या गटातले दोन खासदार आमच्या संपर्कात आहेत. दोन खासदारांनी आमच्याशी संपर्क केला आहे. मतदारसंघात कामं झाली पाहिजेत ही त्यांची इच्छा आहे. यासाठी या दोन्ही खासदारांनी मोदींना पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली आहे. मुल्ला मौलवींना पैसे देऊन मतं मिळवण्याची उद्धव ठाकरेंची भूमिका आम्हाला पटलेली नाही. असं या खासदारांनी सांगितलं आहे. या खासदारांवर पक्षांतर बंदी कायद्याच्या अंतर्गत कारवाईचा धोका आहे. त्यासाठी या दोन खासदारांनी योजनाही तयार केली आहे. असंही नरेश म्हस्केंनी स्पष्ट केलं. आम्ही सहा खासदारांची संख्या जमवतो आमि लवकरात लवकर एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात नरेंद्र मोदींना आम्ही पाठिंबा

देऊ असं या दोघांनी सांगितल्याचा दावा नरेश म्हस्केंनी केला आहे. त्यामुळे आता ठाकरे गटात पुन्हा भूकंप होणार का? या चर्चांना उधाण आलं आहे

महापालिकेच्या भरती प्रक्रियेला वेग

अहमदनगर : लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपताच महापालिकेच्या रखडलेल्या कर्मचारी भरती प्रक्रियेला वेग आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस मार्फत ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. महापालिकेकडून परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम त्यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे कर्मचारी भरती संदर्भातील प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची चिन्हे आहेत.

महापालिकेतील मंजूर असलेल्या दोन हजार ८७१ पदांपैकी दीड हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. जून महिन्यात आणखी काही कर्मचारी निवृत्त होणार आहेत. तांत्रिक कर्मचार्यांची कमतरता असल्यामुळे कामकाजात अडथळे येत आहेत. त्यामुळे महापालिकेने राज्य शासनाकडे कर्मचारी भरतीबाबत प्रस्ताव पाठवला होता. राज्य शासनाने महानगरपालिकेतील रिक्त पदांपैकी १३४ तांत्रिक पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. याबाबतची सर्व माहिती महापालिकेकडून टाटा कन्सल्टन्सीला देण्यात आलेली आहे.

कर्मचारी भरती प्रक्रियेअंतर्गत होणार्या परीक्षेसाठी अभ्यासक्रम काय असावा, याची सविस्तर माहितीही महापालिकेकडून देण्यात आली आहे. त्यानुसार प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. आचारसंहितेमुळे ही प्रक्रिया रखडली होती. मात्र आता आचारसहिता संपताच या प्रक्रियेला वेग आला आहे. त्यामुळे येत्या महिनाभरात महापालिकेतील तांत्रिक कर्मचारी भरतीची प्रक्रिया सुरू होण्याची चिन्हे आहेत.

आमदार थोरातांच्या नेतृत्वात राज्यात काँग्रेसला मोठे यश

तेरा उमेदवार मोठ्या मताधिक्याने लोकसभेला झाले विजयी

संगमनेर : महाविकास आघाडीमधील प्रमुख नेते व काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाने लोकसभा निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली असून १३ जागांवर मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे. तर उत्तर महाराष्ट्रातून घवघवीत यश मिळाले असून आठपैकी सहा जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत. अठराव्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी मोठी राजकीय धामधूम झाली. भाजपने चारशे पारचा नारा दिल्यानंतर इंडिया आघाडीने देशभरात राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली जोरदार मुसंडी मारली. महाराष्ट्रामध्ये

महायुती विरुद्ध महाविकास आघाडीची लढत झाली.

ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व काँग्रेस नेते आमदार बाळासाहेब थोरात, नाना पटोले, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, खासदार संजय राऊत यांच्या प्रमुख नेतृत्वात महाविकास आघाडीने ३० जागा जिंकल्या आहेत. यासाठी आमदार बाळासाहेब थोरात यांनी विदर्भात नागपूर, गडचिरोली, रामटेक, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर तर मराठवाड्यात नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, औरंगाबाद, बीड, पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, शिरूर, हातकणंगले, मुंबई, ठाणे, पालघर याठिकाणी जोरदार प्रचार सभा घेतल्या. त्याचबरोबर उत्तर महाराष्ट्राची जबाबदारी सांभाळताना जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक दिंडोरी, अहमदनगर व शिर्डी मतदारसंघातही जोरदार प्रचार यंत्रणा राबवली.

उत्तर महाराष्ट्राची जबाबदारी आमदार थोरात यांच्यावर असताना त्यांनी अत्यंत काटेकोरपणे प्रचाराचे नियोजन करून आपली यंत्रणा कामाला लावली. यामुळे आठ पैकी सहा जागांवर मविआला मोठे यश मिळाले आहे. नंदुरबारमधून काँग्रेसचे ॲड. गोवाल पाडवी हे सर्वात मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. तर धुळ्यामधून माजी मंत्री डॉ.शोभा बच्छाव विजयी झाल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या अहमदनगर दक्षिणमध्ये जायंट किलर ठरलेले नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके हे डॉ. सुजय विखे पाटील यांचा पराभव करून विजयी झाले. याचबरोबर शिर्डीमधून भाऊसाहेब वाकचौरे यांनी विद्यमान खासदार सदाशिव लोखंडे यांचा पराभव केला. शिर्डी व अहमदनगरमध्ये आमदार थोरातांची प्रचार यंत्रणा मोठ्या पद्धतीने काम करत होती.

नाशिकमधून राजाभाऊ वाजे हे विक्रमी मतांनी निवडून आले. तर दिंडोरीमधून भास्कर भगरे हे निवडून आले. हे सहा उमेदवार निवडून आणण्यामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, विविध पुरोगामी पक्ष यांचे कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते यांनी मोठे परिश्रम घेतले. या सर्वांना मार्गदर्शन करून प्रचाराचे काटेकोर नियोजन करणारे आमदार बाळासाहेब थोरात या विजयाचे शिल्पकार ठरले आहेत. त्यांच्या नेतृत्वात राज्यात काँग्रेस पक्षाला १३ जागांवर मोठ्या मताधिक्याने विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या विजयात मोलाचा वाटा उचलणारे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेचे आमदार बाळासाहेब थोरात यांनी कौतुक केले आहे.

श्रीरामपूर तालुक्यात खरिपाचे २६ हजार ३०० हेक्टर उद्दिष्ट

बळीराजाची खरिपाची तयारी अंतीम टप्प्यात, काही ठिकाणी कपाशी लागवडीला वेग

खरिपाचा हंगाम काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शेतकरी सज्ज झाला आहे. श्रीरामपूर तालुक्यात सध्या खरीप पेरणीपूर्व मशागतीच्या कामास सुरुवात झाली आहे. नांगरणी, वखरणी, खत पसरविणे आदी कामांबरोबरच बी-बियाणे, खते खरेदीसाठी आर्थिक जुळवाजुळव शेतकर्यांकडून सुरू आहे. यासाठी कृषी विभागानेही तयारी पूर्ण केली असून यंदा २६ हजार ३०० हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळे शेतकर्यांच्या खरिपाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. खरीप हंगामात शेतकर्यांना रासायनिक खतांची टंचाई भासू नये यासाठी ५ हजार २८५ मेट्रिक टन खताचा साठा तालुक्यात उपलब्ध आहे.

या खरीप हंगामामध्ये सोयाबीन १६१०० हेक्टर, मका ३६५० हेक्टर, कपाशी ६२३० हेक्टर, भुईमूग १२० हेक्टर, बाजरी २०० हेक्टर अशा पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. जून महिना सुरू होताच पाऊस झाल्याने

राहिलेल्या मशागतीला वेग आला आहे. यंदाचा खरीप बळीराजासाठी चांगला जाईल अशी अपेक्षा आहे. मागील तीन वर्षांपासून शेतकरी राजा अस्मानी संकटाबरोबरच, शेती मालाला नसलेला भाव, खते, बी-बियाणांच्या वाढत्या किमती, मजूर टंचाई बरोबरच वाढलेले मजुरीचे दर अशा विविध संकटांचा सामना करत हवालदिल झाला आहे. बळीराजा पुन्हा स्वत:ला सावरून काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या खरीप हंगामाच्या तयारीस लागला आहे.

खरीप हंगामात पिकाच्या निकोप आणि उत्तमवाढीसाठी जमिनीची मशागत करण्यावर शेतकर्यांनी भर दिला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत सोयाबिनचे क्षेत्र वाढणार आहे. सोयाबिनसाठी १६१०० हेक्टर क्षेत्र गृहीत धरण्यात आले आहे. त्यापाठोपाठ कपाशी ६२३० हेक्टर नंतर मका ३६५० हेक्टर क्षेत्र गृहीत धरण्यात आले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत मक्याच्याही क्षेत्रात वाढ होताना दिसत आहे. बाजरी पीकही २०० हेक्टरवर घेतले जाणार आहे. यंदा खरीप हंगामात ५ हजार २८५ मेट्रिक टन खताचा साठा आहे. शेतकर्यांनी कीड- रोगाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शेताची खोल नांगरट व बांध स्वच्छ करावेत. अधिकृत विक्रेत्यांकडूनच खते बियाणे खरेदी करून पक्की पावती घ्यावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्री. अविनाश चंदन यांनी केले आहे.

सोयाबिनला चांगला भाव मिळावा ही अपेक्षा

खरीप हंगाम सुरु होताच बळीराजा शेतीच्या मशागतीला लागतो. शेतीच्या नांगरणी, रोटा, बियाणे, खते आदींच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यात मजुराची टंचाई असल्याने मजुरीसाठीही मोठ्या प्रमाणात पैसा खर्च होतो. त्यात पीक काढणीला आले की हवामानाचा लहरीपणा यामुळे बळीराजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यातच शासनाच्या दुटप्पी धोरणामुळे शेतमालाला कधीही चांगला भाव मिळत नाही. गेल्या तीन ते चार वर्षांपासून सोयाबिनला कवडीमोल भाव मिळत आहे. त्यात खर्चही निघत नाही. त्यामुळे यंदाच्या खरिपातील सोयाबिनला चांगला दर मिळावा, अशी माफक अपेक्षा बळीराजा करत आहे.

माझ्या पराभवाला कुणीही जबाबदार नाही : लोखंडे

मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह पिचड, आ. लहामटे, आ. काळे, कोल्हे, मुरकुटे यांनी आपल्या विजयासाठी मेहनत घेतली. मात्र आपला पराभव झाला असला तरी यापूर्वी दहा वर्षे खासदार म्हणून कधीही मुजोरपणा केला नाही. आता हरलो तरी नाराज न होता जनतेच्या कामांना प्राधान्य देवून ते सोडवण्यासाठी आपला प्रयत्न राहणार असल्याचे शिर्डीतील महायुतीचे पराभूत उमेदवार सदाशिव लोखंडे यांनी सांगितले.

शिर्डीत कार्यकर्त्यांशी संवाद साधताना श्री. लोखंडे म्हणाले, माझ्या पराभवाला कोणीही जबाबदार नाही. खासदार म्हणून आपण कोठे कमी पडलो याचे आत्मपरीक्षण करणार आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीच्या सर्व नेते व कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून आपले काम केले. दहा वर्षात केलेली विकास कामे जनतेपर्यंत पोहचवण्यात आपण कमी पडल्याने आपला पराभव झाला. ४५ वर्षे रखडलेल्या निळवंडेच्या कामासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न केले. त्यात यश मिळाले. मतदार संघातून कांदा निर्यातबंदीसाठी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांना भेंटून केलेल्या प्रयत्नांना यश आले. नाफेड मार्फ़त कांदा ख़रेदी केंद्र सुरू करूनही विरोधकांकडून याबाबत चुकीची माहिती पसरवण्यात आल्याने कांदा उत्पादकांच्या रोषाला या निवडणुकीत सामोरे जावे लागले. मात्र आपण केलेल्या पाठपुराव्यामुळे मंजूर झालेल्या कामांच्या पुर्ततेसाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहोत.

शिर्डीत आपला पराभव झाला असला तरी आगामी काळात जनतेच्या सेवेसाठी आपण शिर्डीतच थांबणार आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्यावर प्रेम करून आपल्या विजयासाठी खुप मेहनत घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनीही आपल्या विजयासाठी प्रयत्न केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मतदार संघात अनेक बैठका घेऊन कार्यकर्त्यांना सक्रीय केले. काळे, कोल्हे, पिचड, लहामटे आदी एकाच व्यासपिठावर आले.

इगतपुरी तालुक्यातील सात धरणांनी गाठला तळ

इगतपुरी तालुक्यात सात मोठी धरण आहे. मात्र यावर्षी उन्हाची लाई लाई व तापमान बघता आणि पाऊसाचे प्रमाण कमी या दोन्ही समीकरणाने तालुक्यातील. सात धरणानी अक्षरशः तळ गाठला आहे. त्यामुळे जून महिन्यात पाऊस पडला नाहीतर दुष्कळाला सामोरे जावे लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

सात मोठे जलप्रकल्प असलेल्या इगतपुरी तालुक्यात उन्हाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात १५ टँकरद्वारे एकूण १६ गावे व ४८ वाड्यांना पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. धरणांच्या तालुक्यातच तसेच अर्धा महाराष्ट्राला पाणीपुरवठा करणाऱ्या तालुक्यातील वाड्या पाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. कुठे गेल्या शासनाच्या जलजीवन योजना, आणि कधी येणार नळाद्वारे घरापर्यंत पाणी असा प्रश्न आदिवासी वाड्यापाड्यातील महिला वर्गांकडून व्यक्त होत आहे.

हर घर नल का जल हीच का सरकारची जलजीवन मिशन सफल झाली का? असा प्रश्न ग्रामीण भागातील महिलांकडून उपस्थित केला

जातो आहे. इगतपुरी तालुक्यातील भावली, भाम दारणा, कडवा व वाकी या धरणामध्ये शून्य टक्के पाणी साठा असून धरणारलागतच्या गावानाच पिण्याच्या पाण्या पासून वंचीत आहे. धरणातील जलसाठा संपुष्टात आला असून, आता मृत जल साठ्यावर येथील जलाशयाची मदार आहे. तर भावली धरणात अवघा शून्य टक्के साठा शिल्लक राहिल्याने पावसाला विलंब झाला तर तालुक्यातील अनेक गावांची चिंता वाढण्याची शक्यता आहे.

विशेष व उल्लेखनीय बाब म्हणजे धरणालगतच्या असलेल्या वाड्या पाड्यांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. धरणात पाणी दिसत असतानाही उशाशी असलेल्या वाड्यापाड्यांना मात्र टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याची खंत अनेक वाड्यांना जाणवते. भाम धरणालगत असलेल्या मांजरगावच्या दोन वाड्या भरवज निरपनची वाडी, काळूस्तेची दरेवाडी, त्रिंगलवाडीचा बंधारा रिकामा झाल्याने त्रिंगलवाडीसह पाच वाड्यांना याबरोबरच वाकी धरणालगत असलेल्या वाळविहीर परिसरातील सहावाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. याबरोबरच खैरगावच्या दोन वाड्या शेवगेडांग दोन वाड्या, कुरुंगवाडीची एक वाडी, आंबेवाडीच्या दोन वाड्या, बलायदुरीची एक वाडी वासाळीची एक वाडी, आवळखेड, बळवंतवाडी तसेच गरुडेश्वरच्या चार वाड्या, मायदरासह दोन वाड्या, खेडच्या दहा वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

इगतपुरी तालुक्यात १५ टँकरद्वारे ४१ फेऱ्यांच्या माध्यमातून १६ गावे व ४८ वाड्यांना पिण्याचे पाणी पुरविले जाते असल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरम्यान दरवर्षी यातील बहुतांश वाड्यापाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो त्यामुळे टँकरमुक्त तालुका व हंडामुक्त गावे ही संकल्पना, घोषणा कागदावर आहेत की काय असा सवाल व्यक्त होत आहे या वाड्या पाड्यांना जलजीवन योजनेच्या माध्यमातून कायमस्वरूप योजना राबविण्यासाठी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी सकारात्मक पुढाकार घेणे अपेक्षित आहे

तालुक्यातील सर्वच धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली होती त्यात कालांतराने रोटेशनच्या माध्यमातून बहुतांश धरणातील पाण्याचा विसर्ग करण्यात आला. यामुळे धरणातील बहुतांश जलसाठा कमालीचा घटला होता. आज स्थितीत तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या भाम, भावली वाकी दारणा धरणातील जलसाठा संपुष्टात आला असून आता मृत साठ्यावर अवलंबून राहावे लागणार आहे तर भावली धरणात अवघा शून्य टक्के जलसाठा शिल्लक राहिल्याने आगामी काळात पावसाने विलंब केला तर तालुक्याची चिंता वाढण्याची शक्यता आहे. तसेच कडवा प्रकल्पातही केवळ ९ टक्के पाणी शिल्लक आहे.

इगतपुरी तालुका हा सर्वाधिक पर्ज्यनामान असलेला तालुका म्हणून ओळखला जातो मात्र दिवसेंदिवस तालुक्यातील पर्ज्यनमानात घट होत आहे यामध्ये सर्वाधिक. सण २०१९ मध्ये जून महिन्यापासून ते सप्टेंबर पर्यंत ५५५३ मिमी सर्वाधिक पाऊस पडला होता त्यानंतर पुढील जी आकडेवारी ही ती कमीच होताना दिसत आहे सण २०२० मध्ये ३८८० मिमी पाऊसाची नोद झाली होती तर २०२१ मध्ये ३६२६ मिमी ची नोंद झाली होती तर सन २०२२ मध्ये विक्रमी ५२२१ मिमी पाऊस पडला होता तर २०२३ मध्ये ३४९४ मिमीची नोंद झाली आहे

नाशिकमध्ये शिवसेना ठाकरे गट आणि शिंदे गट आमने-सामने

मुंबई : लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपलेली असतानाच नाशिक विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी येथील महसूल आयुक्त कार्यालयात शिंदे व ठाकरे गट पुन्हा आमने सामने आले व दोन्ही गटाने एकमेकासमोर घोषणाबाजी केल्याने काही वेळ गोंधळ निर्माण झाला होता .पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला .

लोकसभा निवडणुकीचे निकाल नुकतेच संपन्न झाले या निवडणुकीत ठाकरे गटाने बाजी बाजी मारून राजाभाऊ वाजे हे विजयी झाले आहे. हा पराभव महायुतीच्या कार्यकर्त्यांना चांगला जिव्हारी लागलेला दिसतो आहे. परिणामी आज नाशिक विभाग शिक्षक मतदार संघाच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशी ठाकरे गटाच्या वतीने संदीप गुळवे यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यानंतर महायुतीच्या वतीने शिंदे गटाचे किशोर दराडे हे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आले असता दोन्ही गट समोरासमोर आल्याने घोषणायुद्ध सुरू झाले.

परंतु वेळीच सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बारी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास शेळके यांनी हस्तक्षेप केल्याने मोठा वाद टळला. याप्रसंगी पालकमंत्री दादा भुसे, खासदार माजी खासदार हेमंत गोडसे तसेच विजय करंजकर, राजू लवटे आदी उपस्थित होते. मात्र घोषणायुद्ध होण्यापूर्वी विद्यमान खासदार राजाभाऊ वाजे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर तसेच विलास शिंदे हे नुकतेच महसूल आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर पडले होते.

अजितदादांची राजकीय इनिंग सुरू झालेल्या संस्थेत घातले लक्ष!

सुप्रिया सुळेंची मोठी घोषणा

बारामती : बारामतीतून लोकसभेची निवडणूक मोठ्या फरकाने जिंकलेल्या सुप्रिया सुळे यांनी मोठी घोषणा केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राजकीय इनिंगची सुरुवात झालेल्या इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लढविण्याचा निर्धार त्यांनी बोलून दाखवला. त्यामुळे सुप्रिया सुळे आता अजितदादांचे वर्चस्व असलेल्या प्रत्येक संस्थांमध्ये लक्ष घालणार, असेच दिसून येते.

पइंदापूरशहरात झालेल्या सत्कार समारंभात खासदार सुप्रिया सुळे यांनी ही भावना बोलून दाखवली. छत्रपती कारखान्याची निवडणूक लढवायची, जिंकायची आणि कारखाना रूळावर आणायचा, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. सुळे यांच्या या घोषणेमुळे अजित पवारांचे एकहाती वर्चस्व असलेल्या छत्रपती सहकारी साखर कारखान्याची निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

त्रपती सहकारी साखर कारखाना हा इंदापूर आणिबारामतीतालुक्याच्या सीमेवर आहे. दोन्ही तालुक्याच्या राजकारणावर प्रभाव राखून असणारा हा साखर कारखाना आहे. संपूर्ण इंदापूर तालुका आणि बारामतीमधील ५३ गावे हे छत्रपती साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र आहे. गेली अनेक वर्षांपासून कारखान्यावर पवार घराण्याच्या विचाराची सत्ता आहे.उपमुख्यमंत्री अजित पवारआणि इंदापूरचे आमदार दत्तात्रेय भरणे यांची राजकीय कारकिर्द ही छत्रपती सहकारी साखर कारखान्यापासून झालेली आहे. त्यामुळे या दोघांचे छत्रपती कारखान्याशी जिव्हाळ्याचे नाते आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत काटे, उपाध्यक्ष अमोल पाटील यांच्यासह विद्यमान संचालक मंडळाने अजित पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कारखान्यावर सध्या अजित पवार यांचे एकहाती वर्चस्व आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांना इंदापूर तालुक्यातून २५ हजार ९५१, तर बारामती तालुक्यातून ४७ हजार ३८१ मताधिक्य मिळाले आहे, त्यामुळे इंदापूर आणि बारामतीवर अजूनही शरद पवारांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. पवारांना मानणारा मोठा वर्ग दोन्ही तालुक्यांत असल्याचे लोकसभेच्या निकालावरून दिसून येते. आता सुप्रिया सुळे यांनी छत्रपती साखर कारखान्याची निवडणूक लढविण्याची घोषणा केल्याने अनेकांचा भूवया उंचावल्या आहेत. मात्र, लोकसभा निवडणुकीतच याची चुणूक दिसून येत होती.

त्यानुसार निवडणुकीचा निकाल लागताच सुप्रिया सुळे यांनी छत्रपती कारखान्याची निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे.राज्यातील इतर सहकारी संस्थांप्रमाणे इंदापूरमधील छत्रपती सहकारी साखर कारखान्याची निवडणूक गेली चार वर्षांपासून रखडली आहे.

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत ११ मे २०२० रोजी संपली आहे. मात्र, कारखान्याचे क्रियाशिल व अक्रियाशिल मतदारावरून उच्च न्यायालयात वाद सुरू आहे. कोर्टातील याचिका आणि कोरोनामुळे गेली चार वर्षे छत्रपती कारखान्याची निवडणूक पुढे ढकलली आहे. काखान्याची अंतिम यादी आतापर्यंत चार वेळा प्रसिद्ध करण्यात आली आहे. उच्च न्यायालयात येत्या ११ जून अंतिम मदारायादीवर सुनावणी होणार आहे.

आयोगाकडूनच 'तुतारी' अन् 'पिपाणी'चा घोळ!



नाशिक :- जिल्ह्यातील दिंडोरी मतदार संघात केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार यांचा पराभव करून पेशाने शिक्षक असलेल्या भास्कर भगरे यांनी इतिहास घडविला. पण नाव व निशाणी सारखी असलेल्या एका 'निरक्षर' अपक्ष उमेदवाराने लाखाहून अधिक मते घेतल्याने पराभव होता होता खा. भगरे वाचले. निवडणूक आयोगाकडून याबाबत सुधारणा होत नाही. हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे का? याबाबत मात्र जनतेत चर्चा सुरू आहे.

भाजपने कमी मार्जिनने जिंकलेल्या जागा भरपूर आहे

भाजपने कमी मार्जिनने जिंकलेल्या जागा भरपूर आहे. दोन हजारपेक्षा कमी मार्जिनने या जागा जिंकल्या आहेत. भाजपने (इगझ) संपूर्ण भारतात अगदी काहीही उलटसुलट गोळाबेरीज केली तरी किमान ५० जागा अश्याच मिळवलेल्या आहेत. प्रशासकीय यंत्रणेवर काय दबाव होता, हे महाराष्ट्रात बीड किंवा मुंबईतलोकांनी डोळ्यांनी पाहिलेलं आहे. बीडमध्ये तर बजरंग बाप्पा सोनावणे या उमेदवाराने तर निवडणूक अधिकाऱ्यांना आत्मदहनाची धमकी दिल्यानंतर प्रशासन थोडेफार हलले अन्यथा त्यांचा पराभव जाहीर करण्याचेच फक्त बाकी राहिले होते. तरी देखील मुंबईत रवींद्र वायकर यांना अशाच पद्धतीने विजयी घोषित करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट होत असते, पण त्यात कालापव्यय मोठ्या प्रमाणावर होतो व निवडून आलेल्या सच्चा उमेदवाराला मात्र मनस्ताप (हशर्रीरलहश)सहन करावा लागतो. कुठं चुकलं आणि काय चुकलं याचा शोध घेतला तर दुसऱ्यांदा चुका आणि परिणाम टाळता येतात, हे आयोगाने ध्यानात घेण्याची गरज आहे. महाराष्ट्रात (चरहरीरीहीर)सातारला शशिकांत शिंदेच्या पराभवाला 'पिपाणी' चिन्हाचा खेळ जबाबदार आहे. जर आयोग निष्पक्षपातीपणे वागला असता तर चारशे पारच्या पिपाण्या केव्हाच पिचल्या असत्या. जर रडीचा डाव न खेळता ५६ इंच छातीने शुरासारखे लढले असते, तर भाजप दीडशे आणि एनडीएचा कार्यक्रम दोनशेमध्ये आटोपला असता.

'तुतारी वाजविणारा माणूस' व फक्त 'तुतारी' या दोन चिन्हांनी मोठ्या प्रमाणावर घोळ

'तुतारी वाजविणारा माणूस' व फक्त 'तुतारी' या दोन चिन्हांनी मोठ्या प्रमाणावर घोळ घातला. त्याचा फटका साताऱ्यातील उमेदवाराला बसला तर दिंडोरीतील उमेदवार हारता हारता वाचला. विशेष म्हणजे दिंडोरीतील शरद पवारांचा उमेदवार खरोखरच 'सर' आहे. तथापि, त्यांच्या विरोधातील उमेदवार तिसरी पास असतानाही त्याच्या नावापुढे 'सर' शब्द लावला. जो खरा 'सर' आहे त्याच्या नावापुढे 'सर' शब्द नसल्याने दुसरेच 'सर' खरे उमेदवार आहे, असे समजून लोकांनी मतदान (ौींळपस) केले व त्यांनी लाखाहून अधिक मते घेतली. आता हा खेळ सोपा वाटू लागल्यामुळे अनेक उमेदवार नामसदृश्य असलेल्या उमेदवारांना निवडणुकीत(शश्रशलींळेप) उभे करून वेगळ्या मार्गाने राजकारण करू पाहत आहे. नाशिकमध्ये शिक्षक मतदार संघात ठाकरेंच्या शिवसेनेने संदीप गुळवे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या विरोधात शिंदेंच्या शिवसेनेने(डहळीं ड्शपर) विद्यमान आमदार किशोर प्रभाकर दराडे यांना उमेदवारी दिली. परंतु त्याच नावाच्या एका अपक्ष उमेदवाराने अर्ज भरल्याने त्याला मारहाण करण्याचा प्रयत्न झाला.

याशिवाय संदीप गुळवे नावाचे तीन उमेदवार उभे राहिले. असे प्रकार विविध मतदार संघात होऊ लागल्याने निवडणूक आयोगाने त्यावर उपाययोजना करण्याऐवजी फक्त सत्तारूढ गटाला मदत करण्याची भूमिका सातत्याने घेतल्याने लोकशाहीचे अध:पतन होत आहे. समान चिन्ह व समान नावे यावर उपाययोजना झाल्या नाही, तर भविष्यात महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात एक वेगळाच संदेश जाऊ शकतो. याशिवाय बॅलेट पेपरवर काही उमेदवारांचे चिन्ह ठळक, तर काही उमेदवारांचे चिन्ह अस्पष्ट देण्यामागे निवडणूक आयोगाची नेमकी भूमिका तरी काय? हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे.

दिंडोरी शहरासह तालुक्यात पावसाची तूफानी हजेरी!

दिंडोरी : गेल्या दोन ते तीन दिवसांपासून वातावरणात बदल होवून सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास दिंडोरी शहरासह तालुक्यातील काही ठिकाणी विजेच्या कडाकाटासह पावसाने हजेरी लावल्याने शेतकर्यांमध्ये समाधानाचे वातावरण तयार झाले आहे.

यावेळी दिंडोरी - नाशिक रस्त्यावरील रणतळे जवळ झाड रस्त्यावर पडून काही काळ वाहतुक कोंडी झाली होती. त्यानंतर नागरिकांनी झाड बाजूला करुन वाहतुक सुरळीत करण्यात आली. तसेच खतवड येथे एक तास पाऊस झाल्याने शेतामध्ये पाणी साचून तळ्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

गेल्या महिनाभरापासून उन्हामुळे हैराण झालेल्या नागरिकांना आज झालेल्या पावसाने काहीसा दिलासा मिळाला. तथापि काल मृग नक्षत्रास प्रारंभ होत असल्याने वातावरणात बदल होवून मृग नक्षत्राच्या पहिल्याच दिवशी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

सुर्याचा मृग नक्षत्रात प्रवेश झाल्यानंतर सायंकाळी ४.३० वाजेच्या सुमारास दिंडोरी शहरासह खतवड, आंबेदिंडोरी, तळेगाव दिंडोरी, जानोरी, जऊळके, खेडगाव, बोपेगाव, पालखेड बं., वलखेड, निळवंडी, पाडे, मडकीजांब, वनारवाडी, ननाशी या भागात मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. या पावसाने उकाड्याने हैराण झालेल्या जनतेला थोडासा दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात वाळवाचा एकही मोठा पाऊस झाला नसल्याने दुष्काळी भागातील पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. सुरगाणा, पेठ, दिंडोरी, कळवण तालुक्यातील काही गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा चालू आहे. त्यामुळे मोठ्या पावसाची गरज आहे. या पावसामुळे अनेक ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहे. शेतकर्यांनी शेतात ठेवलेल्या कांदा पीक व इतर पिके झाकण्यासाठी शेतकरी राजाची धावपळ उडाली.

तसेच वादळी वार्याने दिंडोरी - नाशिक रस्त्यावरील रणतळे शिवारात रस्त्यावर झाड पडून वाहतुक कोंडी निर्माण झाली होती. तसेच खतवड येथे साधारण एक तास पाऊस झाल्याने शेतामध्ये पाणी साचले होते.

विजेच्या कडकडाटासह वादळी वार्यासह पावसाने हजेरी लावल्याने वीज प्रवाह खंडीत झाला होता. त्यामुळे दिंडोरी शहरासह काही गावात अंधाराचे साम्राज्य पसरले होते.

आवास योजनेच्या अंमलबजावणीत गोंदिया विभागात अव्वल

गोंदिया : अमृत महाआवास अभियान २०२२-२३ अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार्या जिल्हयांची निवड आज विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केली आहे. केंद्र व राज्य पुरस्कृत अशा दोन्ही आवास योजनांच्या अंमलबजावणीत सरस कामगिरी करत गोंदिया जिल्ह्याने नागपूर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनांच्या अंमलबजावणीत गोंदिया जिल्ह्याने प्रथम, भंडारा द्वितीय तर चंद्रपूर जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीतही गोंदिया जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. चंद्रपूरने द्वितीय तर वर्धा जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

'अमृत महाआवास अभियान २०२२-२३'

गोंदिया जिल्ह्याने प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत २४५० भूमिहीन लाभार्थ्यांपैकी सर्वच लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच या योजनेंतर्गत मंजूर ९५ हजार २९१ मंजूर घरकुलांपैकी ९२ हजार ९७२ घरकुल उभारली असून उर्वरित ६ हजार १६८ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. चंद्रपूर जिल्ह्यांने २ हजार ८५८ भूमिहीन लाभार्थ्यांपैकी १ हजार ८९१ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली तर ४१ हजार ९२३ मंजूर घरकुलांपैकी ३७ हजार ७५० घरकुल उभारली आहेत. भंडारा जिल्ह्याने ५ हजार ९२९ भूमिहीन लाभार्थ्यांपैकी ४ हजार ४९५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली तर ६३ हजार ४६३ मंजूर घरकुलांपैकी ५९ हजार ३०१ घरकुल उभारली आहेत.

केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांची अंमलबजावणी

राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्याने १२ हजार ५७६ मंजूर घरकुलांपैकी १२ हजार २४० घरकुल उभारली आहेत. चंद्रपूर जिल्ह्याने २३ हजार २७५ मंजूर घरकुलांपैकी २२ हजार ९९० घरकुल उभारली आहेत तर वर्धा जिल्ह्याने ११ हजार १७० मंजूर घरकुलांपैकी १० हजार ३२५ घरकुल उभारली आहेत. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव मुक्त वसाहत योजना आदी ग्रामीण गृह निर्माण योजना राज्यभर राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार्या जिल्हा व तालुक्यांना २० नोव्हेंबर २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतीमान करण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी अमृत महाआवास अभियान २०२२-२३ अंतर्गत पुरस्काराने गौरविण्यात येते.

या पुरस्कार योजनेंतर्गत नागपूर विभागातील जिल्हे व तालुक्यांच्या कामगिरीवर आधारित प्रस्तावांचा अभ्यास करुन विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या अंमलबजावणी व सनियंत्रण व मुल्यमापन समितीने केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत उत्कृष्ट कार्य करणार्या प्रत्येकी तीन जिल्हे व तालुक्यांची निवड केली आहे. निवड समितीत आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त रवींद्र ठाकरे, सहायक कामगार आयुक्त राजदीप धुर्वे, विभागीय आयुक्त कार्यालयातील महसूल उपायुक्त दिपाली मोतीयेळे, उपायुक्त पुरवठा जळेकर, उपायुक्त विकास कमलकिशोर फुटाणे आदींचा समावेश आहे.

नरेंद्र मोदी एनडीएच्या नेतेपदी; नितीश, चंद्राबाबूंचेही समर्थन, मित्रपक्षांचे पाठिंब्याचे पत्र

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीत २९३ जागा जिंकणाऱ्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) नेतेपदी पंतप्रधाननरेंद्र मोदीयांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली. दिल्लीत बुधवारी झालेल्या या बैठकीत तेलुगू देसम पक्षाचे चंद्राबाबू नायडू व संयुक्त जनता दलाचे नेते नितीश कुमार यांच्यासह सर्व घटकपक्षांच्या नेत्यांनी एनडीएला समर्थन देत असल्याचे पत्र सादर केले. त्यामुळे निकालानंतर चंद्राबाबू आणि नितीश कुमार यांच्या राजकीय भूमिकेबाबत सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला.- ऊतएठढखडएचएछढराष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व घटक पक्षांची बैठक बुधवारी पंतप्रधानांच्या निवासस्थानी बोलावण्यात आली होती. यामध्ये पंतप्रधाननरेंद्र मोदीयांची आघाडीचे नेते म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीत या प्रस्तावावर सर्व पक्षांनी आपली सहमती नोंदविली.नितीश कुमार यांनी एनडीएने सरकार स्थापनेचा तातडीने दावा करण्याची मागणी केली, तर चंद्राबाबू नायडू यांनीही त्यास उशीर करू नये, असेही मत व्यक्त केले. दरम्यान, या बैठकीनंतर चंद्राबाबू नायडू यांनी केंद्रीय मंत्री केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याशी चर्चा केली. या बैठकीत नायडू यांनी लोकसभाध्यक्षपदासह तीन महत्त्वाच्या खात्यांची मागणी केल्याचे समजते.

शुक्रवारी राष्ट्रपतींकडे दावा; शनिवारी शपथविधी?

एनडीएच्या सर्व खासदारांची शुक्रवार, ७ जून रोजी दुपारी २ वाजता बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत नेतेपदी नरेंद्र मोदी यांची निवड करण्यात येईल. तत्पूर्वी सकाळी ११ वाजता भाजप संसदीय पक्षाची बैठक होऊन त्यामध्ये नरेंद्र मोदी यांची भाजपच्या नेतेपदी निवड केली जाईल.या बैठकीनंतर एनडीएचे सर्व प्रमुख नेते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन मंत्रिमंडळ स्थापनेचा दावा करणार आहेत. त्यानंतर शनिवारी, ८ जून रोजी नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदापंतप्रधानपदाची शपथ घेणार असल्याची शक्यता विश्वसनीय सूत्रांनी वर्तविली आहे.राष्ट्रपतींकडून लोकसभा विसर्जित, मोदींचा राजीनामा

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना १७ वी लोकसभा तातडीने विसर्जित केली. तत्पूर्वी पंतप्रधान मोदी यांनी बुधवारी सकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेत केंद्रीय मंत्रिमंडळासह पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

राष्ट्रपतींनी पंतप्रधानांसह मंत्रिमंडळाचा राजीनामा स्वीकारला, तरी नव्या सरकारने कार्यभार स्वीकारेपर्यंत नरेंद्र मोदी आणि त्यांच्या मंत्रिमंडळांने आपली सेवा बजावावी अशी सूचना केली आहे.

निकालाच्या दिवशी शेअर बाजारात मोठा घोटाळा; राहुल गांधींचा गंभीर आरोप

दिल्ली : लोकसभा निवडणुकीत मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीएला बहुमत मिळाले असून इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या. त्यामुळे येत्या दोन ते तीन दिवसात एनडीएचे सरकार स्थापन होण्याची शक्यता आहे. पंरतु, लोकसभा निवडणुकीच्या आधी विविध संस्थांचे एक्झिट पोल समोर आले होते. या सर्व एक्झिट पोलमध्ये भाजपला ३०० च्या आसपास जागा दाखविण्यात आल्या होत्या. त्यामुळे शेअर मार्केटमध्ये (डौंलज्ञ चरीज्ञशीं) अचानक मोठ्या प्रमाणावर उसळी पाहायला मिळाली होती. मात्र, ४ जूनला निवडणुकीच्या निकाला दिवशी शेअर मार्केट अचानक कोसळले होते. त्यामुळे अनेक गुंतवणूकदारांना मोठा फटका बसला होता.

यावर आज काँग्रेस नेते राहुल गांधींनी शेअर मार्केटमध्ये निकालाच्या दिवशी सर्वात मोठा घोटाळा झाला आहे, असे म्हणत नरेंद्र मोदी, अमित शहा आणि निर्मला सीतारामण यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, नरेंद्र मोदी (छरीशपवीर चेवळ) आणि अमित शाह यांनी शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या पाच कोटी कुटुंबांना विशिष्ट गुंतवणुकीचा सल्ला का दिला? गुंतवणुकीचा सल्ला देणे हे त्यांचे काम आहे का? दोघांच्या मुलाखती एकाच मीडियाला का दिल्या गेल्या? हाच उद्योग समूह जो स्टॉकमध्ये फेरफार केल्याप्रकरणी सेबीच्या चौकशीत आहे. बनावट एक्झिट पोलर्स आणि एक्झिट पोल जाहीर होण्याच्या एक दिवस अगोदर गुंतवणूक करणाऱ्या संशयास्पद विदेशी गुंतवणूकदारांचा काय संबंध आहे? पाच कोटी पगार दारांची मागणी आहे की हा घोटाळा कोणीतरी भारतीय किरकोळ गुंतवणूकदारांनी केला आहे आणि मोदी व शाह यांनी खरेदी करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे याची चौकशी करण्यासाठी आम्ही आज संयुक्त संसदीय समितीची मागणी करतो, असे राहुल गांधींनी म्हटले.

तसेच ते पुढे म्हणाले की, संपूर्ण भारत या मागचे सत्य जाणून घेऊ इच्छित आहे. खोट्या एक्झिट पोलचा शेअर मार्केटवर परिमाण झाला. नरेंद्र मोदी, अमित शाह, निर्मला सितारामण यांनी शेअर मार्केटवर टिप्पणी केल्यामुळे आधी मार्केट वरती गेलं आणि ४ जून रोजी मार्केट खाली आलं. यामध्ये ४ तारखेला तब्बल ३० लाख कोटी रूपयांचे नुकसान झाले, असा मोठा दावा राहुल गांधी यांनी केला. तसेच हा फक्त अदानी मुद्द्यापेक्षा एक व्यापक मुद्दा आहे. तो अदानी मुद्द्याशी जोडलेला आहे, पण हा खूप व्यापक मुद्दा आहे. हा थेट मोदी, शाह यांची गोपनीयता आहे.

वास्तविक निवडणूक निकालांवरील डेटा, कोणाकडे आयबी अहवाल आहेत, कोणाचा स्वतःचा डेटा आहे, जो किरकोळ गुंतवणूकदारांना स्टॉक खरेदी करण्याचा सल्ला देत आहे, असेही राहुल गांधींनी म्हटले.